विभागीय वन अधिकारी,गट-अ (वरिष्ठ श्रेणी)
या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना....

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन आदेश क्र.एमएफएस-२०१७/प्र.क्र.९३(भाग-१)/फ-८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०१९.

वाचा : १) शासन आदेश महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-२०१७/प्र.क्र.९३(भाग-१)(४)/फ-८, दि.१२ डिसेंबर, २००८.

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.डब्ल्युएलपी-२०१८/प्र.क्र.४८१/फ-१, दि.१ मार्च, २०१९.

शासन आदेश :-

शासन आदेश, संदर्भ क्र.१ दि.१२/१२/२०१८ अन्वये वन विभागातील सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे- रू.५०००) या संवर्गातील ८ अधिकाऱ्यांची विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे- रू.६६००) या संवर्गामध्ये खुल्या प्रवर्गासाठी राखीव जागांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरहू आदेशामध्ये श्री.महादेव नामदेव मोहिते यांच्या पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील, असे नमूद करण्यात आले आहे.

२. शासन निर्णय, संदर्भ क्र.२ दि.०१/०३/२०१९ अन्वये सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे यांच्या कार्यालयातील विभागीय वन अधिकारी (अवैध शिकार प्रतिबंधक घटक), ठाणे हे पद सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्र यांच्याकडे वर्ग करण्यात आले असून त्याचे पदनाम विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि.सातारा असे करण्यात आहे.

३. सदर पदावर पदस्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.सबब श्री.महादेव नामदेव मोहिते, सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) यांची विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गात पदोन्नतीनंतरची पदस्थापना खालील प्रमाणे करण्यात येत आहे:-

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	मंजूर महसूली संवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	पदोन्नतीने प्रस्तावित पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५	६
१	श्री.महादेव नामदेव मोहिते	पुणे	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), चांदोली राष्ट्रीय उद्यान, मुख्यालय कराड, जि.सातारा	रिक्त पदावर

४. वरील अधिकाऱ्याच्या पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या पदावर अन्य अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. हे आदेश दि.०१/०४/२०१९ पासून अंमलात येतील. नियंत्रक अधिकाऱ्यांनी श्री.मोहिते यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी विहित दिनांकास कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

६. श्री.मोहिते यांना कार्यमुक्त केल्यानंतर विहित मुदतीत ते नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.३०/०४/१९९१ व दि.१२/०९/२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच पदोन्नती नाकारणाऱ्या अधिकाऱ्याला आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत विभागीय वन अधिकारी पदाचा १२/२४ वर्षाचा लाभ दिला असल्यास तो तात्काळ थांबविण्यात यावा व त्यांना विभागीय वन अधिकारी संवर्गात प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर सदरचा लाभ देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

६. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याने विभागीय वन अधिकारी या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर वेतन निश्चितीचा विकल्प तात्काळ द्यावा. असा विकल्प न दिल्यास, त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्र.११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

७. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०३०२१५४०२१०३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.03.02 15:43:04 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५. सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक /सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)
६. वनसंरक्षक,कार्य आयोजना विभाग ,पुणे.
७. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.-१२), मंत्रालय, मुंबई-३२
८. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
११. सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१२. संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) , म.रा.नागपूर यांचे मार्फत.
१३. निवड नस्ती (फ-८ कार्यासन)महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२